महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(१)(३)/२०२२/तेवीस दिनांक : ७ फेब्रुवारी, २०२४

## -:प्रसिध्दीपत्रक:-

**विषय :** महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा-२०२२
पोलीस उपनिरीक्षक

**संदर्भ :** जाहिरात क्रमांक ०३६/२०२३

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा - २०२२ पोलीस उपनिरीक्षक या संवर्गाची (जाहिरात क्रमांक ०३६/२०२३) परीक्षा दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ (पेपर क्रमांक १) व दिनांक २९ ऑक्टोबर, २०२३ (पेपर क्रमांक २) आयोगामार्फत घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेतील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या निकालाबाबत उमेदवारांकडून सातत्याने विचारणा होत आहे. यासंदर्भात खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत निवडप्रक्रियेसंदर्भात तृतीयपंथी उमेदवारांचे ०१ पद आरक्षित ठेवण्याबाबत मा.न्यायाधिकरणाचे दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२२ रोजी आदेश प्राप्त झाले आहेत. तृतीयपंथी संदर्भातील अन्य प्रकरणावर झालेले आदेश विचारात घेऊन मा. न्यायाधिकरणाच्या उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने संकीर्ण अर्ज आयोगाकडून दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. यास्तव, सन २०२२ मधील पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षेचा निकाल अद्याप प्रलंबित आहे.

३. तसेच सन २०२१ मधील पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा-२०२१ च्या शारीरिक चाचणीमधून मुलाखतीस पात्र झालेल्या उमेदवारांचा मुलाखत कार्यक्रम मार्च, २०२४ मध्ये घेण्याचे नियोजित असल्याचे यापूर्वीच आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक १९ जानेवारी, २०२४ च्या प्रसिध्दीपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आले आहे.

उपसचिव (परीक्षोत्तर) (अराजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई